महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

सोमवार ❖ ०२ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १५७ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



# ठाकरे गटाचे १० आमदार संपर्कात

## गुलाबराव पाटलांचे सूतोवाच

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

महायुतीला विधानसभेच्या निवडणुकीमध्ये बहुमत मिळालं, तर महाविकास आघाडीचा मोठा पराभव झाला. विधानसभेत मिळालेल्या मोठ्या यशानंतर महायुतीकडून राज्यात सरकार स्थापनेसाठी हालचाली सुरु आहेत. मात्र, निकाल लागून आठ दिवस झाले तरीही अद्याप सरकार स्थापन होऊ शकलेलं नाही. यातच महायुतीचा मुख्यमंत्री कोण होणार? मुख्यमंत्री पदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडणार? याबाबत सस्पेंस कायम असल्याचं बोललं जात आहे. तसेच काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पद सोडल्याची भूमिका आधीच पत्रकार परिषदेत जाहीर केलेली आहे. पण एकनाथ शिंदे यांनी महायुतीकडे राज्याचं गृहखातं मागितल्याची चर्चा आहे. मात्र, गृहखातं देण्यास भाजपाचा विरोध असल्याचं बोललं जात आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे हे नाराज असल्याची चर्चा आहे.

यातच ते दोन दिवस साताऱ्यातील त्यांच्या दरेगावी गेले होते. दरम्यान, या सर्व घडामोडीवरून महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून टीका करण्यात येत आहे. यावर शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर खोचक टीका केली होती. याच टीकेला उत्तर देत शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते गुलाबराव पाटील यांनी मोठं विधान केलं आहे. 'ठाकरे गटाचे १० आमदार आमच्याकडे (शिवसेना शिंदे) येण्याच्या तयारीत आहेत', असा दावा गुलाबराव पाटील यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. 'त्यांच्या (उद्धव ठाकरे) महालामध्ये आमच्या सारख्यांची देखील एक वीट आहे. मात्र, त्या विटांना विसरले म्हणून संजय राऊत यांच्यासारखा एक दगड घेऊन आले आणि त्या दगडाने त्यांच्या महालाचा पूर्ण सत्यानाश करून टाकला. ते जळगाव जिल्ह्यात येऊन आमच्या पाच जागा पाडणार होते. दोन-दोन दिवस जिल्ह्यात येऊन बसले, पण साधा एक उमेदवार ते वाचू शकले नाहीत. त्यामुळे संजय राऊतांना आतातरी हे ओळखावं आणि उद्धव ठाकरे यांनीही संजय राऊतांना ओळखावं. अन्यथा जे २० आमदार आहेत ना? त्यातील १० आमदार आमच्याकडे येण्याच्या तयारीत आहेत. आगे-आगे देखिए होता है क्या', असं गुलाबराव पाटील यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

# कर थकले !

## ठाणे महापालिका आर्थिक संकटात




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

ठाणे : ठाणे महापालिकेच्या सेवेत ५१८४ अधिकारी कर्मचारी असून महिन्याकाठी १२० कोटी रुपये पगारासाठी खर्च होतात. पण सध्या पालिकेच्या तिजोरीत अवघे ९५ कोटी रुपये असल्याची बाब पुढे येत आहे. त्यामुळे या महिन्यात पगार कसा द्यावा, अशी चिंता प्रशासनाला सतावत आहे. ठाणे महापालिकेच्या सेवेत एकूण ५१८४ अधिकारी आणि कर्मचारी आहेत. त्यामध्ये कर्मचाऱ्यांचे पगार, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे पेन्शन आणि टीएमटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी दरमहिना १२० कोटी रूपये खर्च केला जातो. ठाणे महापालिकेच्या तिजोरीत अवघे ९५ कोटी २५ लाख रुपये शिल्लक आहेत. तर केंद्र सरकारकडून जीएसटी स्वरूपात दरमहिना ९४ कोटी रुपये येतात. मात्र हे पैसे फक्त कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च होत असून पाणीपट्टी, घरपट्टी तसेच शहर विकासाच्या उत्पन्नावर पालिकेची आर्थिक भिस्त आहे. त्यामुळे आता थंडावलेली वसुली मोहीम अधिक व्यापक प्रमाणात सुरू करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत ठाणे महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी व्यस्त होते. निवडणुकीत ठाणे महापालिकेचे जवळपास ३,५०० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जुंपले होते. त्यामुळे प्रशासनाची वसूली मोहीम थंडावली असल्याने त्याचा परिणाम पालिकेच्या तिजोरीवर झाला असल्याची माहिती ठाणे महापालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

# ठाणे जिल्हा रुग्णालयात ७२ मुलांवर शस्त्रक्रिया!

**शहापूर,वाडा,जव्हारपासून दुर्गम भागातील आदिवासी तसेच गोरगरीब मुलांवर या शस्त्रक्रिया**

**राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत मुरबाड, शहापूर, जव्हार, ठाणे तसेच नवी मुंबईतून आलेल्या बालकांवर शस्त्रक्रिया**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : ठाणे जिल्हा रुग्णालयात रविवारी १ डिसेंबर रोजी सकाळी साडेसात वाजल्यापासून सायंकाळी सातवाजेपर्यंत एकाच दिवसात तब्बल ७२ लहान मुलांवर वेगवेगळ्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ठाणे जिल्ह्यातील शहापूर, वाडा, जव्हारपासून दुर्गम भागातील आदिवासी तसेच गोरगरीब मुलांवर या शस्त्रक्रिया करण्यात आल्या.निमित्त होते विख्यात बालशल्यचिकित्सक डॉ संजय ओक यांच्या वाढदिवसाचे. खरतर गेले अनेक दिवस या शस्त्रक्रियांसाठी ठाणे जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ कैलास पवार तसेच अन्य डॉक्टर तयारी करत होते. गेल्या दोन दिवसांपासून रुग्ण व त्यांचे नातेवाईक रुग्णालयात दाखल झाले होते. त्यांच्या जेवणापासून ते शस्त्रक्रियेची सर्व जय्यत तयारी करण्यात आली होती. रविवारी सकाळपासून डॉ संजय ओक तसेच पालिकेच्या शिव रुग्णालयातील त्यांचे सहकारी डॉक्टर आणि ठाणे जिल्हा पान ४ वर ▶▶

# विश्रांतीनंतर मुख्यमंत्री ठाण्यात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे प्रकृती ठीक नसल्याच्या कारणामुळे मागील काही दिवसांपासून त्यांच्या सातारा येथील दरेगावी गेले होते. रविवारी सायंकाळी ते पुन्हा ठाण्यात परतले. त्यांच्या भेटीसाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची गर्दी झाली होती. शिंदे गावी निघून गेल्याने महायुतीच्या सत्तास्थापनेच्या बैठकांच्या फेऱ्या होत नव्हत्या. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शुक्रवारी सातारा जिल्ह्यातील त्यांच्या मूळगावी निघून गेले होते. त्यामुळे महायुतीतील चर्चेच्या फेऱ्या होऊ शकल्या नव्हत्या. रविवारी सायंकाळी ते हेलिकॉप्टरने पुन्हा ठाण्यात आले. त्यांच्या स्वागतासाठी शिंदे गटाचे नेते दीपक केसरकर, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे तसेच ठाण्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिंदे हे ठाण्यात परतल्याने आता राज्याच्या सत्तास्थापनेच्या घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे. तसेच महायुतीच्या बैठकांच्या फेऱ्या देखील सुरू होण्याची शक्यता आहे.



# "मी डोंबिवलीतच!"

## रवींद्र चव्हाण यांचे स्पष्टीकरण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी**

**डोंबिवली** : मागील पाच दिवसांपासून महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदासाठी भाजपच्या इतर नेत्यांबरोबर डोंबिवली विधानसभा मतदारसंघातील भाजपचे नवनिर्वाचित आमदार आणि ज्येष्ठ नेते रवींद्र चव्हाण यांचेही नाव चर्चेला येत आहे. शनिवारी ते तातडीने दिल्ली येथे गेल्याची चर्चा समाजमाध्यमांवर पसरली होती. काही माध्यमांनी याविषयी बातम्या चालविल्या. या सगळ्या अफवांवर स्पष्टीकरण देताना भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी मात्र, मी डोंबिवलीतच आहे, मी दिल्लीला गेलेलो नाही, असे स्पष्टीकरण ट्विटर (एक्स) च्या माध्यमातून रविवारी दिले आहे.

गेल्या तीन दिवसांपासून मी माझ्या डोंबिवली विधानसभा मतदारसंघात आहे. सद्यस्थितीत डोंबिवलीतील नागरिकांच्या भेटीगाठी घेत आहे. मी दोन दिवसात किंवा मध्यरात्री कुठल्याही वरिष्ठ नेत्याच्या भेटीसाठी दिल्ली अथवा अन्य



ठिकाणी गेलेलो नाही, असे स्पष्टीकरण देऊन नेते चव्हाण यांनी सुरू असलेल्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

आठवडा होत आला तरी राज्याचा मुख्यमंत्री ठरत नसल्याने राज्याच्या मुख्यमंत्री पदावरून विविध प्रकारच्या चर्चा सुरू आहेत. या चर्चेच्या माध्यमांतून अफवा पसरत आहेत. राज्याचा मुख्यमंत्री ठरविण्याच्या जोरदार हालचाली दिल्लीत भाजपच्या वरिष्ठ वर्तुळात सुरू आहेत. मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाबरोबर, या चर्चेबरोबर मराठा चेहरा महाराष्ट्राला देण्याची गरज असल्याच्या चर्चा भाजपच्या वरिष्ठ वर्तुळात आहेत. मध्यप्रदेश, हरियाणाचा अनुभव भाजप नेत्यांच्या पान ४ वर ▶▶

# रुग्णालयाचा भुखंड फेरीवाल्यांच्या विळख्यात



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ठाणे : प्रतिनिधी**

नवी मुंबई : शहराची निर्मिती करत असताना सिडकोने स्माजिक सुविधांसाठी अनेक भुखंड आरक्षित ठेवले आहे. मात्र असे भुखंड सुरक्षित ठेवण्यात पालिकेला सपशेल अपयश आले असून यातील बहुतांश भूखंडावर अवैध इमारती बांधण्यात आल्या आहेत तर काही भूखंडावर फेरीवाल्यांनी बस्तान बसवले आहे. अशीच परिस्थिती घणसोलीमध्ये आहे.

घणसोली येथील सेक्टर-७ मध्ये रुग्णालयासाठी आरक्षित असणाऱ्या भुखंडावर भाजी विक्रेत्यांनी विनापरवाना बस्तान बसवले आहे. पालिकेने आरक्षित केलेल्या अनेक भुखंडावर सध्या फेरीवाल्यांनी डोळा ठेवला आहे. घणसोलीत या भुखंडावर भाजी विक्रेत्यांनी अतिक्रमण केले आहे. या भुखंडावर लावण्यात आलेल्या लोखंडी जाळया आणि गेट हा गंजल्याने काढून टाकण्यात आल्या आहेत. त्यातच या ठिकाणी रस्त्यावर बसणाऱ्या भाजी विक्रेत्यांनी या मैदानावर अतिक्रमण केले आहे. गेट तोडून भाजी विक्रेत्यांनी शिरकाव केला आहे. भाजी विक्रेते, कांदा-बटाटा विक्रेत्यांनी मागील काही महिन्यांपासून विनापरवाना व्यवसाय सुरु केला आहे. पालिकेने आरक्षित केलेल्या भुखंडावर अतिक्रमण करुन हा भुखंड गिळंकृत करण्याचा डाव असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. घणसोलीतील अतिक्रमणपथक इतर ठिकाणी रस्त्यावर बसलेल्या फेरीवाले, खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कारवाई पान ४ वर ▶▶

# ठाण्यात काँग्रेसला धक्का !

## शेकडो पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी**

**ठाणे** : शहरातील काँग्रेसचे मनोज शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी शिवसेना (शिंदे गट) पक्षात प्रवेश केला असतानाच, त्यापाठोपाठ आता, कळव्यातील काँग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजप पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे ठाणे शहरात काँग्रेस पक्षाला खिंडार पडल्याची चर्चा सर्वत्र सुरु आहे.

कळवा पूर्व घोलई नगर येथील काँग्रेसचे सामाजिक न्याय ठाणे



शहर अध्यक्ष जगदीश गौरी हे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह रविवारी वर्तक नगर येथील भाजप कार्यालयात दाखल झाले. भाजपचे कामगार मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव प्रशांत तळवडेकर यांच्या पुढाकाराने आणि भाजप ठाणे जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले यांच्या उपस्थितीत जगदीश गौरी यांचा आणि काँग्रेसचे इतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा भाजप पक्षात प्रवेश झाला.

काँग्रेस मध्ये असताना आमची कुठलीही कामे होत नव्हती, काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणाचा आम्हाला कंटाळा आला होता, त्यामुळे आम्ही सगळयांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे जगदीश गौरी यांनी यावेळी सांगितले. त्यांच्यासोबत काँग्रेसचे असंघटित कामगार ठाणे शहर सचिव दिनेश शिळकर, सामाजिक न्याय विभाग ठाणे शहर सचिव संदीप सूर्यवंशी, सुशांत धुळप, पान ४ वर ▶▶

# लालपरीचे तिकीट महागणार ?

## ■ महामंडळाकडून १८ टक्के भाडेवाढीचा प्रस्ताव



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता मुंबई □ प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुका पार पडलेल्या आहेत. आणि भरघोस मतांनी यावर्षी महायुती विजयी झालेली आहे. हाती आलेल्या माहितीनुसार ५ डिसेंबर रोजी राज्याचा मुख्यमंत्रीचा शपथ विधी पूर्ण होणार आहे. हा शपथविधी मुंबईतील आझाद मैदानावर होणार आहे. तसेच महायुतीयोल मंत्री पदांची देखील घोषणा केली जाणार आहे. निवडणुका पार पडण्याआधी महायुती सरकारने नागरिकांना अनेक आश्वासने दिली होती.परंतु आता ही आश्वासने सरकार खरच पूर्ण करणार आहे का? की सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री बसणार आहे? याकडे सगळ्यांचे लक्ष आहे. अशातच हाती आलेल्या माहितीनुसार आता पान ४ वर ▶▶

# शहापूरात धान खरेदीत भ्रष्टाचार सुरूच !

## आदिवासी विकास महामंडळाचे दुर्लक्ष

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर** : महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळातर्फे दरवर्षी आधारभूत किंमत योजनेअंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून भातासह भरड धान्य खरेदी केली जाते. मात्र, या खरेदीत गैरप्रकार झाल्याचे मागील तीन वर्षात उघडकीस आले आहे. असे असतांना या भ्रष्टाचारात दरवर्षी वाढ होतांना दिसत आहे. हा भ्रष्टाचार रोखणार कोण, असा सवाल

**खर्डी येथे १५८२ शेतक-यांचे ५७ हजार १३६.२० क्विंटल इतके भात खरेदी केले होते. हा भात खर्डी येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एका नादुरुस्त व पडक्या इमारतीमध्ये ठेवला होता. संततधार पावसाने हे भात कुजून शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले होते. या मागे उपव्यवस्थापक वसावे याचे साटेलोटे उघडकीस आले होते.**

शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात आहे. आदिवासी विकास महामंडळ हे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालास योग्य मोबदला मिळावा, यासाठी 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर काम करीत आहे.खरेदी होणाऱ्या संपूर्ण शेतीमालाची, शेतकऱ्यांची नोंदणी एनइएम १ या पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करण्यात येते. मात्र सदर योजना राबवितांना मागील काही वर्षांत पीक पेरा कमी असतांना जादा पीक पेरा दाखविणे, बनावट ७/१२ उतारे निदर्शनास पान ४ वर ▶▶



## कल्याणच्या झिरो डिग्री डान्स अकॅडमीला सिल्व्हर मेडल

○ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ○




**कल्याण :** शहरातील नामांकित झिरो डिग्री डान्स ?केडमीने नुकताच भारताच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला आहे. मागील अनेक वर्षांपासून कल्याण शहरात झिरो डिग्री डान्स ?केडमीने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असून आता त्यांनी भारताबाहेर विदेशातही डंका वाजवला आहे. नुकतेच मलेशिया येथे पार पडलेल्या 'पदन्यास एंटरटेनमेंट' आयोजित 'इंडियास इंटरनेशनल ग्रुव्हफेस्ट २०२४' या स्पर्धेत झिरो डिग्री डान्स ?केडमीच्या टीमने अद्भुत नृत्याविष्कार सादर करीत भारतासाठी रौप्य पदक जिंकले आहे. झिरो डिग्री डान्स ?केडमीने याआधी देखील सोनी एंटरटेनमेंट आयोजित 'इंडियास गॉट टलेंट'च्या फायनलमध्ये धडक दिली होती. त्यानंतर त्यांचे हे दुसरे मोठे यश आहे.

झिरो डिग्री डान्स ?केडमीचे संस्थापक व मुख्य प्रशिक्षक मोहम्मद मोशीन यांनी आजवर हजारो डान्सर तयार केले आहेत. नृत्यकारांच्या केलेला लहानपणा पासून वाढविण्याचे काम ते आजवर करीत आले आहेत. मलेशियात होणाऱ्या या स्पर्धेची कमी वेळात त्यांनी आपल्या लहानग्यांकडून तयारी करून घेतली. संपूर्ण स्पर्धेत झिरो डिग्री डान्स ?केडमीचा दबदबा राहिला. प्रेक्षकांमध्येही झिरो डिग्री सुवर्ण पदक जिंकेल अशी चर्चा होती. मात्र अनपेक्षितरित्या दुसऱ्या टीमला सुवर्ण पडकाचे मानकरी घोषित करण्यात आल्याचे सांगण्यात येते. तर भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या झिरो डिग्रीला रौप्यपदक प्रदान केले गेले. भारतासाठी रौप्यपदक मिळवणे ही बाब आमच्यासाठी अभिमानाची असल्याच्या भावना यावेळी झिरो डिग्री डान्स ॲकेडमीचे संस्थापक मोहम्मद मोशीन यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केल्या.

झिरो डिग्री डान्स ?केडमीची स्थापना केल्या पासून मी हजारो नृत्यकारांना घडवले आहे. मलेशियातील स्पर्धेसाठी आम्ही खरं तर वर्षभरापूर्वी पासूनच तयारी केली होती. जवळपास १२ देशातील ५०० हुन अधिक स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. आम्हाला अभिमान आहे की देशासाठी आम्ही सिल्व्हर मेडल जिंकले. आम्ही देशवासियांना प्रॉमिस करतो की पुढील वर्षी आम्ही पुन्हा सहभागी होऊ आणि गोल्ड मेडल जिंकून आणू असा विश्वास यावेळी झिरो डिग्री डान्स ॲकेडमीचे संस्थापक मोहम्मद मोशीन यांनी व्यक्त केला.

## महाराष्ट्र रेडिओलॉजीस्ट संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. प्रशांत पाटील




### डॉ.विजय सूर्यवंशी, डॉ. इंदुराणी जाखड यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र रेडिओलॉजिस्ट संघटनेच्या कल्याणात झालेल्या शानदार सोहळयात डॉ. प्रशांत पाटील यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्विकारली. गुरुदेव ग्रँड हॉटेलच्या सभागृहात राज्य उत्पादन शुल्क खात्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, केडीएमसी आयुक्त डॉ इंदुराणी जाखड यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत रेडिओलॉजीस्ट संघटनेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण कार्यक्रम संपन्न झाला. विशेष म्हणजे यावेळी कल्याणातील ब्रह्मवृंदांनी वैदिक मंत्रोच्चाराच्या जयघोषात डॉ. पाटील यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली.

काही महिन्यांपूर्वी झालेल्या महाराष्ट्र रेडिओलॉजिस्ट संघटनेच्या निवडणूकीत कल्याण आयएमएचे माजी अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील यांच्यासह इतर सहकाऱ्यांचा दणदणीत विजय झाला होता. या निवडणूकीत डॉ. प्रशांत पाटील हे अध्यक्षपदी निवडून आले असून रेडिओलॉजिस्ट संघटनेच्या कल्याणात झालेल्या तीन दिवसीय परिषदेच्या पदग्रहण कार्यक्रमात डॉ. पाटील यांच्यासह डॉ.सुशांत भदाणे यांनी सचिव तर डॉ.संदीप महाजन यांनी खजिनदार पदांचा पदभार यावेळी स्विकारला. या पदग्रहण सोहळयाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितीत असलेले राज्याचे उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यावेळी कोविड काळात कल्याणच्या डॉक्टर आर्मीने केलेल्या कामगिरीचा विशेष उल्लेख करीत डॉक्टर आर्मीच्या सदस्य डॉक्टरांचे पुनश्च आभार मानले. तर डॉ. प्रशांत पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्यातील उत्साहाचा झरा आणि सतत काही तरी नविन करण्याचा ध्यास हा या गुणांचा महाराष्ट्र रेडिओलॉजिस्ट संघटनेला नक्कीच फायदा होईल अशी भावना व्यक्त केली. तर सर्वांना एकत्रित घेऊन पुढे जाण्याच्या नेतृत्व कौशल्याच्या बळावर डॉ. प्रशांत पाटील हे या महाराष्ट्र रेडिओलॉजिस्ट संघटनेला एका वेगळया उंचीवर नेऊन ठेवतील असा विश्वास केडीएमसी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी व्यक्त केला.

दरम्यान या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्रातील ज्येष्ठ रेडिओलॉजिस्ट तज्ञांचा उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला डॉ.आरती विजय सूर्यवंशी, डिसीपी अतुल झेंडे, डीसीपी सचिन गुंजाळ, तहसीलदार सचिन शेजाळ, कल्याण आयएमएच्या अध्यक्षा डॉ. सुरेखा ईटकर, रेडिओलॉजिस्ट संघटनेचे डॉ.संदीप कवठले, डॉ. प्रदीप गांधी, डॉ. संदीप महाजन, डॉ.प्रविण सांगोळे, डॉ. समीर गांधी, केडीएमसीचे उपायुक्त संजय जाधव, कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# उपमुख्यमंत्रिपदासाठी श्रीकांत शिंदेंच्या नावाची चर्चा?

## चर्चेतून बऱ्याचशा गोष्टी सुटतील - एकनाथ शिंदे यांचे सूचक वक्तव्य

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

साताराः विधानसभा निवडणुका पार पडल्या त्यामध्ये महायुतीला मोठं यश मिळालं. मात्र, आता मंत्रीपद आणि मुख्यमंत्री या पदाचा पेच आता निर्माण झाल्याचं चित्र आहे. राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रि?पदावरील दावा सोडला असला तरी देखील एकनाथ शिंदे यांनी काही महत्त्वाच्या पदांची मागणी केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. भाजप नेतृत्वाकडून त्यांना उपमुख्यमंत्रिपदासह इतर काही मंत्रि?पदांचं आश्वासन देण्यात आल्याच्या चर्चा आहेत. मात्र, गृहखातं शिवसेनेला मिळालं तरच मी उपमुख्यमंत्रिपद स्वीकारेन, अशी अट एकनाथ शिंदे यांनी घातल्याच्या राजकीय वर्तुळात चर्चा आहेत. याबाबत आज एकनाथ शिंदे यांनी भाष्य केलं आहे. दरेगावमध्ये एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी पत्रकारांनी तुम्ही गृहमंत्री, विधानसभा अध्यक्षपदाची मागणी केली आहे का? या प्रश्नावर उत्तर देताना एकनाथ शिंदे म्हणाले, 'याबाबतची चर्चा महायुतीमध्ये होईल चर्चेतून बऱ्याचशा गोष्टी सुटतील आणि त्यामध्ये आम्हाला सर्वात महत्त्वाचं मतदारांनी महायुतीला निवडून दिलेलं आहे. त्या मतदारांना केलेल्या कमिटमेंट त्या राज्याच्या विकासाच्या दृष्टीने त्या पूर्ण करायच्या आहेत. मला काय मिळालं कोणाला काय मिळालं यापेक्षा जास्त जनतेला काय मिळणार आहे. महाराष्ट्रातील जनतेने आम्हाला भरभरून मतदान केलेलं आहे. मतांचा वर्षाव केलाय. आता त्यांना आमच्या पद्धतीने देण्याचा प्रयत्न करणार आहोत, असे एकनाथ शिंदे म्हणाले आहेत



उपमुख्यमंत्रिपदासाठी श्रीकांत शिंदेंच्या नावाची चर्चा आहे, याबाबत बोलताना शिंदे म्हणाले, मोदीजी आणि अमित शाह जो निर्णय घेतील तो मला आणि शिवसेनेला मान्य असेल, याबाबत मी स्पष्ट केले आहे. गृह खात्याबाबत चर्चा होईल. लोकांना जी आश्वासन दिले आहेत ती पूर्ण करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. सर्वात महत्त्वाचं मला काय मिळालं दुसऱ्याला काय मिळालं हे महत्त्वाचं नसून जनतेला काय मिळणार आहे हे महत्त्वाचं आहे. उपमुख्यमंत्रिपद श्रीकांत शिंदेंना मिळणार अशा चर्चा आपण पत्रकारच चर्चा करत असता. या सर्व चर्चा आहेत. एक बैठक अमित भाई यांच्यासोबत झाली आहे. दुसरी बैठक आमची तिघांची होईल. त्यामधून महाराष्ट्राच्या हिताचा योग्य तो निर्णय होईल.

विरोधक काहीही बोलतात त्यांना काही काम राहिलेलं नाही. आमच्यामध्ये कोणताही समन्वयाचा अभाव नाही. विरोधकांना काही काम नाही अगदी विरोधी पक्षनेता देखील होता येत नाही. एवढं संख्याबळ आता त्यांचं कमी आहे. झारखंडमध्ये ते जिंकले त्यावेळी काही प्रॉब्लेम नव्हता. लोकसभेमध्ये ते जिंकले त्यावेळी काही प्रॉब्लेम नव्हता. लाडक्या बहिणींचा मोठा सहभाग या विजयामध्ये आहे. या भावांनी शेतकऱ्यांनी आम्हाला प्रेम दिलं या सर्वांच्या आशीर्वादामुळे ही निवडणूक आम्ही जिंकलो. फेरमत मोजणी बाबत निवडणूक निवडणूक आयोग निर्णय घेईल. जेव्हा तुम्ही हरता तेव्हा ईव्हीएम खराब आहे, जेव्हा जिंकता त्यावेळेस ईव्हीएम चांगला आहे, त्यांनी एकच भूमिका घेणे गरजेचे आहे, असंही शिंदे पुढे म्हणालेत.

## पेण येथे नेने महाविद्यालयातर्फे एड्स जनजागृती रॅली







दै.ठाणे जीवनदिप वार्ता

**पेण :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण येथे डी.एल.एल.ई. युनीट, एन.एस.एस. युनीट, 'सोबती' ट्रस्ट आणि उप जिल्हा रुग्णालय - पेण यांच्या संयुक्त विद्यमाने १ डिसेंबर रोजी 'जागतिक एड्स दिना'चे औचित्य साधून एच.आय.व्ही. एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर रॅलीसाठी पे.ए.सो.चे आधारस्तंभ अँड बापूसाहेब नेने, संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड मंगेश नेने, बापुराव आठवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप, डी. एल. एल. ई. युनीट चे जिल्हा समन्वयक डॉ. देवीदास बामणे ,रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे, डॉ.एस.डी.लकडे, विविध शाखांचे प्राध्यापक आणि तसेच विद्यार्थी वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. नेने महाविद्यालयाच्या प्रांगणातून सदर रॅलीची सुरूवात झाली.

यावेळी अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांनी रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना रॅलीसाठी शुभेच्छा देत स्वतःमधील समाजमन कायम जागृत ठेवण्याचे आवाहन केले. तर प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी विद्यार्थ्यांना 'NOT ME BUT YOU' तसेच 'REACH TO UNREACHED' ही एन. एस. एस तसेच डी. एल. एल. ई. युनीट ची ब्रीदवाक्ये अंमलात आणत कायम समाजाच्या सेवेसाठी, उन्नतीसाठी कटीबद्ध राहण्याचे आवाहन केले.

यानंतर गांधी मंदिर-शिवाजी चौक-नगरपालिका-उप जिल्हा रुग्णालय या क्रमाने मार्गस्थ होऊन परत नेने महाविद्यालयाच्या प्रांगणात रॅलीची समाप्ती झाली. सदर रॅली दरम्यान विद्यार्थ्यांनी एड्ससंदर्भात फलक, घोषणा या माध्यमातून जनजागृती करत एच आय व्ही. एड्स मुक्त समाज घडविण्यासाठी नागरिकांना आवाहन केले.सोबती ट्रस्ट तर्फे यावेळी रॅलीतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. सदर रॅलीसाठी जवळपास १५०-२०० विद्यार्थी उपस्थित होते.

## भात झोडणीसाठी मजूरांची वानवा

### मजुरीचे दर वाढल्याने मुरबाडचा शेतकरी हवालदिल!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी

**मुरबाड दि.१-** मुरबाड तालुक्यात सर्वत्र भात कापणीची कामे आटोपली आहेत. आता लक्ष भात पिकाच्या झोडणीकडे लागला आहे परंतु भात झोडणी साठी जेवणासहित पाचशे रुपये मजुरी देऊनही मजूर मिळत नसल्याने शेतकरी मजुरांच्या घरी हेलपाटे मारत आहेत त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

तसेच सर्व शेतकऱ्यांना ज्या ज्या ठिकाणी भाताचे भारे जास्त मिलायचे त्या त्या ठिकाणी भाताच्या भाड्यामध्ये यंदा घठ झाल्याची माहिती शेतकरी वर्गाने दिली आहे.

परंतु मुरबाड तालुक्यातील गावोगावी भात झोडणी सुरू झाल्यामुळे मजुरांची टंचाई भासत असल्याने तालुक्यातील अनेक शेतकऱ्याकडून बोलले जात आहे.



गेल्या वर्षी भात झोडणीच्या मजुरीचा रेट ४५० रुपये होता तोच रेट यंदा ५०० रुपये झाला आहे त्यातच मजुराचा नाश्ता व जेवणाचा खर्च वेगळाच इतके असूनही शेतीकामासाठी मजूर मिळत नाही तसेच सकाळी उठल्यानंतर व सायंकाळी झोडणी साठी वाड्या-पाड्यात जाऊन मजूर शोधण्यासाठी वणवण करावी लागत आहे.

आदिवासी बांधव हे जे शेतमजुरी करायचे तेच मजूर वीट भट्टी तसेच शहराकडे कामासाठी स्थलांतर झाल्यामुळे शेतमजूर मिलने कठीण झाले आहे. तसेच शेतात मजुरांना वर्षभर पुरेल एवढेच काम राहत नाही केवळ हंगामामध्येच ते काम येते त्यामुळे अनेक मजूर शहराच्या ठिकाणी नोकरी धंद्यासाठी निघून गेले असून त्यामुळे आम्हाला नातेवाईक व कुटुंबांना भात झोडणी करावी लागते असे शेतकरी रघुनाथ कोंडाजी धुमाळ यांनी बोलताना सांगितले.

## मुंबईत गारठा वाढल्याने विजेच्या मागणीत घट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

आठवडाभरापासून तापमानाचा पारा घसरत असून मुंबईतील विजेची मागणीही कमी झाली आहे. गारठा वाढल्यामुळे एसी, पंखे, कुलरसाठी विजेचा होणारा वापर कमी झाला आहे. त्यामुळे शनिवारी मुंबईतील मागणी तीन हजार मेगावॅटवरून अडीच हजार मेगावॅटपर्यंत घटली आहे.

## कुर्ला डेपोजवळ खड्ड्यात पडून ७ वर्षांच्या मुलाचा मृत्यू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कुर्ला डेपो मध्ये सुरू असलेल्या विकासकामांसाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यात पडून एका ७ वर्षीय वयाच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. उज्ज्वल रवी सिंग असे या मयत मुलाचे नाव असून तो बाजूच्या वत्सला ताई नाईक नगर या विभागात राहतो. काल दुपारी त्याच्या मित्रांसह कुर्ला डेपो च्या आत खुल्या जागेत खेळण्यास आला असताना घडली घटना. या वेळी तिथे इमारतीच्या निर्मितीसाठी खोदण्यात आलेल्या आणि पाण्याने भरलेल्या खड्ड्यात पडून मृत्यू झाला आहे. उपचारासाठी रुग्णालयात घेऊन गेले मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच नेहरू नगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी या बाबत अपमृत्यूची नोंद केली आहे.

## मुंबईतील पाठक हायस्कूल येथे विज्ञान प्रदर्शन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी

आपणांस विनंती करण्यात येत आहे की, शिक्षण निरीक्षक पश्चिम विभाग मुंबई 'एच वार्ड' अंतर्गत येणाऱ्या शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन व संशोधनवृत्ती वाढण्यासाठी सालबादाप्रमाणे यावर्षीही विज्ञान प्रदर्शनाचे दिनांक ३ डिसेंबर ते ५ डिसेंबर २०२४ दरम्यान सकाळी ९ ते ४ य वेळात पाठक हायस्कूल वाकोला, सांताक्रुझ मुंबई येथे आयोजनकरण्यात येत आहे. ""शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान" या विषया अंतर्गत विज्ञान प्रदर्शनमध्ये विविध उपविषयानुसार प्रकल्प विद्यार्थी सादरीकरण करणार आहेत.

## मुरबाड रोडवर महिलेचे मंगळसूत्र खेचून पोबारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी

कल्याण : येथील पश्चिमेतील सर्वाधिक वर्दळीच्या मुरबाड रस्त्यावरून शुक्रवारी दुपारच्या वेळेत पायी जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन इसमांनी पादचारी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पळ काढला. या महिलेने चोर म्हणून ओरडा केला, तोपर्यंत दुचाकीवरील चोरटे पळून गेले होते. ५५ हजार रूपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र होते.

महात्मा फुले पोलीस ठाण्यात महिलेने या चोरीप्रकरणी तक्रार केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. तक्रारदार महिला कल्याण पश्चिमेतील पौर्णिमा चौक भागात कुटुंबियांसह राहते. शुक्रवारी दुपारी पावणे तीन वाजता तक्रारदार महिला आपल्या शाळकरी मुलीला खासगी शिकवणी वर्गात सोडण्यासाठी पुरंदरे वसाहतीमध्ये गेल्या होत्या. मुलीला सोडल्यानंतर त्या एकट्याच दुपारच्या वेळेत पायी घरी परतत होत्या. त्या मुरबाड रस्त्यावरील किशोर बूट दुकानासमोरून जात असताना, त्यांच्या पाठीमागून अचानक एक दुचाकी वेगाने पादचारी महिलेच्या अंगावर आली. त्या रस्त्याच्या बाजुला झाल्या. तेवढ्या वेळेत दुचाकीवरील इसमांनी तक्रारदार महिलेला काही कळण्याच्या आत त्यांच्या गळ्यातील सोन्याचे ५५ हजार रूपये किमतीचे मंगळसूत्र जोराने हिसकावले. तेथून त्यांनी पळ काढला. मानेला जोराने हिसका बसल्याने महिलेला सुरूवातीला काही क्षण काय घडले हे कळलेच नाही. त्यांनी मानेभोवती हात लावला. त्यावेळी त्यांना आपले सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या इसमांनी खेचून पळून गेले असल्याच्या त्यांच्या निदर्शनास आले. त्या चोर म्हणून ओरडल्या, तोपर्यंत दुचाकीस्वार पळून जाण्यात यशस्वी झाले होते.

कल्याण, डोंबिवलीत काही दिवसांपासून दुचाकीवरून येऊन मंगळसूत्र, सोन्याचा ऐवज लुटण्याचे प्रकार थांबले होते. हे प्रकार आता पुन्हा सुरू झाले आहेत. ठाकुर्लीतील ९० फुटी रस्ता, एमआयडीसी डोंबिवली, खडकपाडा भागात नागरिक सकाळ, संध्याकाळ फिरण्यासाठी येतात. त्या काळात हे प्रकार अधिक प्रमाणात होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत.




सोमवार

02 डिसेंबर 2024

**मेष**
दिवस छान असेल. व्यस्त वेळापत्रक असूनही तुम्ही सकारात्मक राहाल. आज योग्य वेळी योग्य निर्णय घेणे फायदेशीर करिअरशी संबंधित समस्येचे निराकरण करून शांती मिळेल.

**वृषभ**
आज तुमचा दिवस खूप आनंदात जाईल. आज कोणत्याही परिस्थितीत तुम्ही स्वाभिमान आणि आत्मविश्वास कमकुवत होऊ देणार नाही.

**मिथुन**
आत्मविश्वास कायम ठेवा. हे वर्तन चांगले आणि वाईट यांच्यात सुसंवाद ठेवेल. काही संभ्रम निर्माण झाल्यास जवळच्या मित्रांचा सल्ला उपयोगी पडेल. धार्मिक अध्यात्मिक कार्यात वेळ घालवा.

**कर्क**
आर्थिक योजना पूर्ण झाल्यावर मन प्रसन्न राहील. दिवस तुमचा भाग्यशाली असेल. मित्र तुमचे मनोबल वाढवतील. आज तुमचे नियोजित काम पूर्ण करण्यात यश मिळेल. चिंता वाढेल.

**सिंह**
आज आव्हानांचा सामना करा आणि आर्थिक बाबी अधिक चांगल्या करण्याचा प्रयत्न करा दिवस संमिश्र जाईल. मुलांसह शॉपिंग मॉलमध्ये जातील.

**कन्या**
सकारात्मक ऊर्जा जाणवेल. आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज तुम्हाला करिअरमध्ये प्रगतीच्या संधी मिळतील. लोकांमध्ये तुमचे कौतुकही होईल.

**तुळ**
आज तुम्ही तुमचे ध्येय साध्य करण्यासाठी अधिक मेहनत कराल. उधळपट्टीवर नियंत्रण ठेवा. दिवस खूप आनंदाचा असेल. तुमच्या जोडीदाराची मदत प्रभावी ठरू शकते.

**वृश्चिक**
तुमचे शांत व्यक्तिमत्व तुमचे काम नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात मदत करेल. बाह्य क्रियाकलाप आणि जनसंपर्कातही वाढ होईल या राशीच्या

**धनु**
नवीन व्यवसाय सुरू करायचा असेल तर तुमच्या कुटुंबाकडून पूर्ण सहकार्य मिळेल. भाग्य तुमच्यावर कृपा करेल. अचानक काहीतरी साध्य कराल ज्याची तुम्ही खूप दिवसांपासून शोधत होती.

**मकर**
डोळयांच्या समस्यांसाठी चांगल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि आराम मिळेल. मालमत्तेशी संबंधित कामाचे सकारात्मक परिणाम होतील. दिवस खूप चांगला जाईल.

**कुंभ**
लोकांसाठी दिवस चांगला असेल, त्यांना नवीन प्रोजेक्टवर काम मिळेल. ज्यामुळे तुम्हाला जास्तीत जास्त फायदा मिळेल. अवघड निर्णय घ्यावे लागतील.

**मीन**
टूर्स आणि ट्रॅव्हल्सच्या व्यवसायात गुंतलेल्यांसाठी आजचा दिवस लाभदायक आहे. आज तुम्हाला मोठ्या कंपनीसोबत भागीदारी करण्याची संधी मिळेल. बाहेरगावी जाण्याचा प्रसंग येऊ शकतो.



## शिवसेनेच्या बड्या नेत्याचा सूचक इशारा!

# महाराष्ट्रात पुन्हा ‘राजकीय भूकंपाचे संकेत’



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

एकनाथ शिंदे हे गृहमंत्रिपदावर अडून बसले आहेत. गृहमंत्रिपद मिळालं तरच उपमुख्यमंत्रिपद स्विकारणार अशी त्यांची भूमिका आहे. त्यातच ते आता त्यांचं मुळगाव असलेल्या साताऱ्यातील दरे। इथे गेले. आहेत, त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे.

एकनाथ शिंदे हे नाराज असल्याची चर्चा आहे. या सर्व पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना संजय शिरसाट यांनी मोठे वक्तव्य केलं आहे, शिरसाट यांच्या या वक्तव्यानंतर महाराष्ट्रात पुन्हा एकदा राजकीय भूकंप पहायला मिळणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

नेमकं काय म्हणाले संजय सिरसाट?

नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी पाच तारखेपर्यंत होईल अशी अपेक्षा आहे. महायुतीच्या नेत्यांची निवड झाली आहे, मात्र भाजपच्या गटनेत्याच्या निवडीची प्रक्रिया बाकी आहे. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणीस आणि अजित पवार यांनी पूर्ण निर्णय वरिष्ठांवर सोपवलेला आहे. त्यांचा निर्णय सोमवारपर्यंत येईल आणि त्यानंतर दोन दिवसांमध्ये शपथविधी होईल.

शिंदे साहेब मुख्यमंत्री असतानाही गावी जायचे आताही ते गेलेले आहेत. राजकीय उलाढाली होत आहेत, मुख्यमंत्री कोण यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. खातेवाटपावर बोललं जात आहे, याचं उत्तर त्यांना शोधाव लागणार आहे. ते पक्षाचे नेते आहेत, त्यामुळे त्यांना याचं उत्तर शोधण्यासाठी निवांत वेळ हवा असेल, त्यामुळे ते तिथे जाऊन सगळा निर्णय घेतील आणि त्यांचा निर्णय सोमवारी आम्हाला सांगतील, असं शिरसाट यांनी म्हटलं आहे.

दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, मुख्यमंत्र्यांचे नाव जाहीर झाल्याशिवाय कोणतं खातं कोणाकडे आहे, याचं स्पष्टीकरण देऊ शकत नाही. प्रायमरी स्टेजवरती चर्चा झाली आहे. फायनल काही झालं नाही, जर मुख्यमंत्री भाजपचा झाला तर गृहखात आमच्याकडे असावं हा आमचा आग्रह आहे. उपमुख्यमंत्री व गृहखात याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी जाहीर करतील तोपर्यंत वेट अँड वॉच सोमवारी शिंदे साहेब काय निर्णय घेतील हे कळेल. राजकारणात कधीही काहीही होऊ शकतं. कुठलीही उलथापालथ होऊ शकते, याचा नेम नाही. मात्र जोपर्यंत मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा केली जात नाही, तोपर्यंत अनिश्चिता आहे, असं शिरसाट यांनी म्हटलं आहे.

## मनसेचे नेते अविनाश जाधव यांचा राजिनामा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**ठाणे :** मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी रविवारी ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्ष पदाचा राजिनामा दिला आहे. ठाणे आणि पालघर जिल्ह्यात मनसेच्या उमेदवारांचा पराभव झाल्याने त्यांनी राजिनामा दिल्याचे म्हटले आहे. अविनाश जाधव हे ठाणे शहर विधानसभा मतदारसंघातून मनसेचे उमेदवार होते. परंतु त्यांचा देखील पराभव झाला होता.

मनसेचे नेते अविनाश जाधव यांच्याकडे ठाणे आणि पालघरचे जिल्हाध्यक्ष पद आहे. ठाणे आणि पालघर जिल्ह्यात अविनाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उमेदवारांनी निवडणूका लढविल्या होत्या. अविनाश जाधव यांनी सुद्धा ठाणे शहर मतदारसंघातून निवडणूक लढविली होती. परंतु त्यांचा या मतदारसंघातून भाजपचे उमेदवार संजय केळकर यांनी पराभव केला होता. या मतदारसंघात अविनाश जाधव हे तिसऱ्या क्रमांकावर होते. ठाणे जिल्ह्यातील मनसेच्या इतर उमेदवारांचाही पराभव झाला होता. अखेर अविनाश जाधव यांनी ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्ष पदावरून राजिनामा दिला आहे. राजिनाम्याचे पत्र त्यांनी पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांना दिले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे मनसेच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. विधानसभा निवडणूकीत ठाणे आणि पालघर येथील पराभवाची जबाबदारी घेऊन मी जिल्हाध्यक्ष पदाचा राजिनामा दिला आहे. काम करताना माझ्याकडू कळत-नकळत काही चूक झाली असल्यास आपण माफ करवावे असे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

## डोंबिवलीतील रिअल इस्टेट कंपनी सदस्यांकडून व्यावसायिकाची कोट्यवधींना फसवणूक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** डोंबिवली जवळील ठाकुर्लीतील एका रिअल इस्टेट कंपनीच्या सदस्यांनी डोंबिवली जवळील खोणी भागातील एका जमिनीची बनावट कागदपत्रे तयार केली. ही कागदपत्रे खरी आहेत असे दाखवून मुंबईतील एक व्यावसायिक आणि त्याच्या मित्राला विक्री केली. या जमीन विक्रीच्या तडजोडीच्या व्यवहातून लोअर परेलमधील एका उच्चभ्रू गृहसंकुलातील सदनिका आपणास स्वस्तात घेऊन देतो असे सांगून रिअल इस्टेटच्या सदस्यांनी दोन जणांची १० कोटी ४० लाख रूपयांची फसवणूक केली आहे.

सन २०२१ ते २०२३ या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे. गेल्या पाच दिवसापूर्वी या फसवणूक प्रकरणी मुंबईतील कांदिवली परिसरात राहणाऱ्या एका व्यावसायिकाने रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी तक्रारदाराच्या तक्रारीवरून डोंबिवली जवळील ठाकुर्लीतील एका रिअल इस्टेट कंपनीच्या चार सदस्यांसह इतरांवर गुन्हे दाखल केले आहेत.

पोलिसांच्या प्राथमिक तपासणी अहवालात तक्रारदाराने दिलेली माहिती अशी की, ठाकुर्लीतील रिअल इस्टेट कंपनीच्या सदस्यांनी डोंबिवली जवळील खोणी येथील एका जमिनीची बनावट कागदपत्रे तयार केली. ही कागदपत्रे सन २००७ च्या मुद्रांक शुल्क दस्तऐवजावर तयार करण्यात येऊन, ही कागदपत्रे खूप जुनी असल्याचे मुंबईतील जमीन खरेददारांना दाखविण्यात आले. या जमिनीचा मूळ मालक रिअल इस्टेटमधील एक सदस्य नसताना, ते या जमिनीचे मूळ मालक आहेत असे दस्तऐवजावर दाखविण्यात आले. ही जमीन रिअल इस्टेच्या चार आणि इतर सदस्यांनी मुंबईतील कांदिवली भागातील एक व्यावसायिक आणि त्यांच्या मित्राला विक्री केली. त्याच बरोबर या जमिनीच्या तडजोडीच्या व्यवहारातून या जमिनीबरोबर रिअल इस्टेटच्या सदस्यांनी व्यावसायिकांना आम्ही तुम्हाला लोअर परेल येथील एका उच्चभ्रू वसाहतीच्या गृहसंकुलात स्वस्त दरात सदनिका घेऊन देतो, असे खोटे आश्वासन दिले.

या आश्वासनाच्या माध्यमातून सदनिकेच्या नावे रिअल इस्टेटच्या सदस्यांनी एका व्यावसायिकाकडून सहा कोटी ९० लाख आणि त्यांच्या मित्राकडून तीन कोटी ५० लाख रुपये रिअल इस्टेटचे कार्यालय येथे स्वताच्या उपस्थितीत आणि इतर सदस्यांच्या बँक खात्यावर आरटीजीएस माध्यमातून भरणा करून घेतली. तक्रारदारांना जेव्हा जमीन व्यवहार आणि सदनिका व्यवहाराच्या माध्यमातून रिअल इस्टेटच्या सदस्यांनी आपली आर्थिक फसवणूक केली आहे हे निदर्शनास आले. त्यांनी तातडीने रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या प्रकरणात अद्याप कोणाला अटक केलेली नाही. साहाय्यक पोलीस निरीक्षक वसंत पाटील याप्रकरणाचा तपास करत आहेत.

## ‘सागर’ बंगल्यावर हालचाली वाढल्या

### बावनकुळे फडणवीसांच्या भेटीला



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

महायुतीचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबरला संध्याकाळी ५ वाजता आझाद मैदानावर होणार आहे. या दरम्यान सागर बंगल्यावर हालचाली वाढल्याच पाहिला मिळत आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे सागर बंगल्यावर देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी दाखल झाले आहेत. भाजपचे खासदार अशोक चव्हाण, खासदार धनंजय महाडिक आणि भाजप नेते प्रशांत परिचारक देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी सागर बंगल्यावर दाखल झाले आहेत.

**फडणवीसांचा एकनाथ शिंदेंना फोन**

भारतीय जनता पार्टीचे नेते देवेंद्र फडणवीसांनी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना फोन केला आहे. फडणवीसांनी शिंदेंच्या प्रकृतीची विचारपूस केली. एकनाथ शिंदे प्रकृती अस्वास्थ्यामुळे दरे गावात विश्रांतीसाठी गेले आहेत. शिंदे आजच ठाण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त फलाट तिकीट विक्री बंद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** महापरिनिर्वाण दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या प्रमुख स्थानकांवरील गर्दी नियंत्रित करण्यासाठी फलाट तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. त्यानुसार फलाट तिकिटांच्या विक्रीवर २ ते ९ डिसेंबरपर्यंत निर्बंध घातले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशविदेशातील लाखो अनुयायी दादर येथील चैत्यभूमीवर अभिवादन करण्यासाठी येतात. त्यामुळे रेल्वेच्या प्रमुख स्थानकांवर प्रचंड गर्दी होते. त्यामुळे फलाटांवरील गर्दी टाळण्यासाठी मध्य रेल्वेने लांब पल्ल्यांच्या स्थानकांवर फलाट तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्याचानिर्णय घेतला आहे.

## कै.गजानन हिरु पाटील विद्यामंदिर शाळेत आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांमधील कौशल्याचे दर्शन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण : कै.गजानन हिरु पाटील विद्यामंदिर व मातोश्री शेवंताबाई गजानन पाटील माध्यमिक विद्यालय अटाळी तसेच कै.गजानन हिरु पाटील इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स,कॉमर्स अँड सायन्स, अटाळी यांचेमार्फत शाळेच्या प्रांगणामध्ये आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमधील गणितीय संज्ञा स्पष्ट होण्यासाठी, व्यवहार कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी, तसेच समाजासमोर वैविध्यपूर्ण अन्न संस्कृतीचे प्रदर्शन करण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमास संस्था सचिव व मुख्याध्यापक गणेश पाटील तसेच शिक्षकवृंद यांनी मोलाचं योगदान दिले.



या कार्यक्रमाच्या उदघाट्न प्रसंगी संस्था अध्यक्ष नारायण पाटील, लायन्स क्लब कल्याण अध्यक्ष व्ही. एन. गिरी, खजिनदार सुनील शर्मा, महाराष्ट्र राज्य शिव छत्रपती शिक्षक संघटना कोकण विभाग अध्यक्ष प्रशांत भामरे, या संघटनेचे कल्याण अध्यक्ष अनिल पाटील व विलास जाधव, ज्यु. कॉलेज अध्यक्ष अर्जुन उगलमोगले, अखिल भारतीय कोळी संघ अध्यक्ष दशरथ पाटील, लायन्स क्लब कल्याणचे नंदकिशोर तवानी, ठाणे जिल्हा मुख्याध्यापक संघांचे सदस्य भानुदास मडके, बाळकृष्ण जगे, चंद्रकांत ठाकूर, नारखेड, दुसाने, भाऊसाहेब सोनवणे, अनंत किनगे आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास पालकांनी देखील उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमा प्रसंगी लायन्स क्लब कल्याण तर्फे लायन नंदकिशोर तवानी यांनी विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी ५० पुस्तके शाळेस भेट दिली. या कार्यक्रमात ६०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता आणि विद्यार्थ्यांनी १५० पदार्थ विक्रीला ठेवलेले होते. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थे मार्फत संस्था सचिव व मुख्यध्यापक गणेश पाटील यांच्या हस्ते सर्वात जास्त नफा, उत्कृष्ठ सादरीकरण व उत्कृष्ट चव अश्या विविध गुणकौश्यल्या आधारित प्रमाणपत्र वितरित करण्यात आले व उपस्थित सर्व पाहुण्यांचे आभार मानले.

## भारताची लोकसंख्या कमी होत आहे ही चिंतेची बाब – सरसंघचालक मोहन भागवत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**



समाजाकरता कुळाचा त्याग करायचा आणि कुळाकरता एका व्यक्तीचा त्याग करायचा असतो. कुटुंब हा समाजाचा घटक आहे, असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी नागपूरमध्ये बोलताना केलं आहे. जनसंख्या कमी होते हे चिंतेचा विषय आहे. आपल्या देशाची जनसंख्या वाढ ही २.१ पेक्षा कमी नको, हे टिकलं पाहिजे. चांगलं वाईट नंतर ठरवू. आपल्या संस्कृतीची जगाला गरज आहे. सगळे सुखी व्हावे याकरता हा धर्म आहे. जातपात भेद करायला नको. शास्त्रात याला स्थान नाही, असंही भागवत म्हणाले.

## पुण्यातील ११ मतदारसंघांमध्ये EVM फेरतपासणीसाठी अर्ज



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

विधानसभा निवडणुकीत मतमोजणीत घोळ झाल्याच्या आरोपानंतर पुणे जिल्ह्यातील तब्बल ११ मतदारसंघांतील पराभूत उमेदवारांनी मतदान यंत्रांची पडताळणी करण्यासाठी अर्ज केला आहे. या ११ उमेदवारांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ८ आणि काँग्रेसच्या ३ उमेदवारांचा समावेश आहे. शिरूरमधील अशोक पवार, बारामतीतील युगेंद्र पवार, हडपरसमधील प्रशांत जगताप, चिंचवडमधील राहुल कलाटे, खडकवासलामधील सचिन दोडके, पर्वतीमधील अश्विनी कदम, भोसरीमधील अजित गव्हाणे, तर दौंडमधील रमेश थोरात यांचा समावेश आहे. तर पुणे कॅन्टोन्मेंटमधील रमेश बागवे, पुरंदरमधील संजय जगताप आणि भोरमधील संग्राम थोपटे यांनीही अर्ज केला आहे. पडताळणी करण्यासाठी प्रत्येकी ४२ हजार ५०० रुपये अधिक १८ टक्के जीएसटी आकारून एकूण ४७ हजार २०० रुपये आकारले जातात. त्यानुसार या सर्व उमेदवारांनी ६४ लाख ६६ हजार ४०० रुपये जिल्हा निवडणूक शाखेकडे जमा केले आहेत.

## अनिल परब यांच्यासह ४८ जण निर्दोष मुक्त

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

नारायण राणे यांच्या सेना त्यागानंतरची धुमश्चक्री भाजप नेते नारायण राणे यांनी शिवसेना सोडल्यानंतर प्रभादेवी येथे झालेल्या धुमश्चक्रीप्रकरणी शिवसेना नेते अनिल परब, श्रद्धा जाधव, मनसेचे बाळा नांदगावकर, शिंदेसेनेचे सदा सरवणकर आणि अन्य राजकीय नेत्यांची न्यायालयाने निर्दोष सुटका केली आहे. विशेष न्यायालयाच्या न्यायमूर्ती आदिती कदम यांनी शनिवारी परब, नांदगावकर, सरवणकर यांच्यासह ४८ जणांची या खटल्यातून निर्दोष सुटका केली.

## कुणाल पाटील फाऊंडेशनच्या वतीने आरोग्य व रक्तदान शिबीराचे आयोजन



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**कल्याण :** कल्याण ग्रामीण मधील कुणाल पाटील फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराचा नगरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. यावेळी नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली असून रक्तदान करण्यासाठी देखील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सध्या वतावरणात बदल झाला असून हिवाळा सुरू झल्याने अनेक नागरिकांना आरोग्याविषयी समस्या उद्भवत आहेत. नागरिकांची हि समस्या लक्षात घेऊन कुणाल पाटील फाउंडेशन, स्व. विजय पाटील मित्र मंडळ, स्व. राकेश कदम युवा मित्र मंडळाच्या वतीने कल्याण पूर्वेतील श्री मलंग रोड आडीवली समर्थ नगर याठिकाणी मोफत आरोग्य शिबिर आणि रक्तदान शिबिराचे आयोजन आज करण्यात आले होते. यामध्ये जनरल चेकअप, ब्लड ग्रुप चेकअप, हिमोग्लोबीन चेकअप, ई.सी.जी, ओपीडी, नेत्र तपासणी आदी तपासण्या मोफत करण्यात आल्या.

तसेच सध्या रक्ताचा तुटवडा भासत असल्याने रक्तदान शिबिर देखील घेण्यात आले. या रक्तदान शिबिरात परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी कुणाल पाटील फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

## वाढलेल्या थंडीच्या पार्श्वभूमीवर केडीएमसी उपायुक्त संजय जाधव यांनी केली बेघर निवारा केंद्राची पाहणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील बेघर नागरिकांना सुविधा देण्याच्या दृष्टिकोनातून महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार डोंबिवली पूर्वेतील पांडुरंग वाडी येथे तसेच टिटवाळा परिसरात आणि कल्याण पश्चिम येथे महानगरपालिकेने बेघर व्यक्तींसाठी 'बेघर निवारा केंद्राची' व्यवस्था केलेली आहे. या बेघर निवारा केंद्रात बेघर व्यक्तींना नाष्टा, जेवण, स्नानासाठी गरम पाणी व तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था महापालिकेमार्फत केली जाते. काल कल्याण मध्ये वाढलेल्या थंडीच्या पार्श्वभूमीवर समाज विकास विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी रात्री ११ वाजता कल्याण पश्चिम येथील क प्रभागा नजीक तात्पुरत्या स्वरूपात उभारलेल्या बेघर निवारा केंद्राला तसेच डोंबिवली पूर्व येथील पांडुरंग वाडी मधील सावली निवारा केंद्राला भेट देऊन तेथे बेघरांसाठी उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांची पाहणी केली. रात्रीच्या वेळी असलेल्या कडाक्याच्या थंडीचे स्वरूप पाहता तेथील बेघर नागरिकांना पांघरण्यासाठी पुरेशा प्रमाणात चादरी उपलब्ध आहेत याचीही त्यांनी खातर जमा केली आणि बेघर व्यक्तींची आपुलकीने विचारपूस केली.

सध्या कल्याण डोंबिवली परिक्षेत्रात असलेल्या थंडीच्या पार्श्वभूमीवर महापालिका क्षेत्रातील नागरिक व एनजीओ यांनी रात्रीच्या वेळी रस्त्यावर, उघड्यावर झोपलेली एखादी बेघर व्यक्ती आढळून आल्यास यासंदर्भात त्वरित महापालिकेच्या समाज विकास विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन पालिकेने केले आहे.

## शरद पवारांच्या भेटीसाठी संजय राऊत YB सेंटरमध्ये दाखल

### गटनेते म्हणून जितेंद्र आव्हाड यांची नियुक्ती



शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक रविवारी पार पडली. यात गटनेते म्हणून जितेंद्र आव्हाड यांना नियुक्त केले आहे तर मुख्य प्रतोद म्हणून रोहित आर आर पाटील यांची तर प्रतोद म्हणून उत्तम जानकर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. विधिमंडळ पक्षनेत्याची निवड नंतर केली जाईल असं बैठकीनंतर जयंत पाटील यांनी सांगितले.

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ नवीमुंबई प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत शरद पवार यांच्या भेटीला यशवंतराव भवन सेंटर येथे दाखल झाले आहेत. पवार आणि राऊत यांच्यात मत फळणीसंदर्भात चर्चा होण्याची शक्यता आहे. या आधी झालेल्या शरद पवार यांच्या पक्षाच्या बैठकीत वकिलांची टीम तयार करण्याचा निर्णय झाला होता. ईव्हीएमवरुन उमेदवारांनी केलेल्या तक्रारींवर या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा होणार आहे.

**शरद पवारांनी बोलावली पक्षाच्या आमदारांची बैठक**

शरद पवारांनी त्यांच्या पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची आज दुपारी ३ वाजता मुंबईतील पक्ष कार्यालयात बैठक बोलावली आहे. आज होणाऱ्या बैठकीत गटनेता, विधीमंडळ पक्ष नेता आणि मुख्य प्रतोद यांची निवड होण्याची शक्यता आहे. गटनेतेपदी जयंत पाटील यांची तर प्रतोदपदी जितेंद्र आव्हाड यांची निवड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पक्षाचे प्रमुख शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत बैठक पार पडणार आहे.

# वीजबिलाची थकबाकी भरा, नाहीतर कारवाईला सामोरे जा!

**अभय योजनेला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ**

वीजबिलाच्या थकबाकीमुळे कायमस्वरूपी कनेक्शन तोडलेल्या घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांसाठीच्या अभय योजनेला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. योजनेंतर्गत थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होणार आहे, त्यामुळे वाढीव मुदतीत ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणने केले आहे. जागामालक, खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई मात्र होऊ शकते. अभय योजनेत मूळ बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून उर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यात भरण्याची सवलत आहे.

■■■■■■

# पाचवी, आठवीच्या शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचे अर्ज भरण्यास ७ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याआधी विद्यार्थ्यांना ३० नोव्हेंबरपर्यंत नियमित शुल्क भरण्यास मुदत दिली होती. परंतु, शाळा नोंदणी व विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज भरण्यास आता मुदतवाढ देण्यात आली आहे.

■■■■■■

# सिग्नल तोडल्यास सरकारी नोकरांनाही दंड

**पुण्यात दोन दिवसांत दोन चालकांवर कारवाई**

पीएमपीच्या चालक आणि वाहकांबद्दलच्या तक्रारीचे प्रमाण वाढले आहे. नियमांचे सर्रासपणे उल्लंघन होत असल्याचे पीएमपी प्रशासनाच्या लक्षात आल्याने नियम मोडणाऱ्या चालक आणि वाहकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास चालकांना १२०० रुपये दंड भरावा लागणार असून निलंबनाची कारवाई होण्याची ही शक्यता आहे. आत्तापर्यंत प्रवासांच्या तक्रारीनुसार दोन कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे.

■■■■■■

# व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतीत वाढ



आजपासून नव्या महिन्याला सुरुवात झाली आणि महिन्याच्या पहिल्याच दिवशी व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतीत वाढ करण्यात आली. १९ किलोंच्या व्यावसायिक एलपीजी गॅस सिलेंडरमागे १६.५२ रुपयांची वाढ करण्यात आलीय. इंडियन ऑईल कॉर्पोरेशननं गॅसच्या किमती वाढवल्यात. एका सिलेंडरची किंमत १ हजार ७७१ रुपये असणारेय. याचा हॉटेल व्यावसायिकांना फटका बसण्याची शक्यता असून हॉटेलमधील जेवणही महागण्याची शक्यताये.

■■■■■■

# चांगले कार्य करणाऱ्या शिक्षकांची माध्यमांनी दखल घ्यावी - आ. संजय केळकर

## वसंतस्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार व गुणगौरव सोहळा उत्सहात संपन्न




**कल्याण : कल्याण पूर्वेतील मॉडेल कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्समध्ये केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेऊन विद्या योगेश गव्हाणे यांना वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी शिक्षक आमदार ज्ञानेश्वर भोईर, पदवीधर आमदार निरंजन डावखरे आदींसह इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ प्रतिनिधी

**ठाणे:** गेली अनेक वर्षापासून डावखरे साहेबांनी पाठीवर शाबासकीची थाप देणारा उपक्रम सुरू केला आहे. कोकणातील विद्यार्थी व शिक्षक कायम पुढे आहेत. त्यामुळे कोकण पुढे आहे. कोकणात बोगस शाळा नाहीत. कोकणाचा निकाल महाराष्ट्रात सर्वात जास्त लागतो त्यामुळे प्रत्येक जिल्हयात पाच शाळा व कोकणातील पाच जिल्हयातील प्रथम ५ विद्यार्थ्यांचा सत्कार पुढील वर्षापासून आपण करावा. मिडीयाने शिक्षकांचे हातून नकळत झालेले चुकांप्रमाणे चांगले कार्याच्या बातम्या सुद्धा द्यावेत. चांगले कार्य करणाऱ्या शिक्षकांची माध्यमांनी दखल घ्यावी. तसेच विधानसभेत दिलेल्या यशाचे शिक्षकांसाठी चिज करु असे आमदार संजय केळकर यांनी वसंतस्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार व गुणगौरव सोहळयामध्ये मार्गदर्शन करून पुरस्कार प्राप्त सर्व शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी व संस्थाचालक यांचे कौतुक व अभिनंदन केले.

भाजपा शिक्षक आघाडी कोकण विभागाचे वतीने दिनांक ०१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता तृप्ती बँक्वेट, चौथा मजला, एम.एच. हायस्कूल, शिवाजी पथ, ठाणे येथे वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष कोकण पदविधर मतदारसंघाचे आमदार ॲड निरंजन डावखरे यांनी सर्वांचे स्वागत केले.

वसंतस्मृती आदर्श शिक्षक व संस्थाचालक पुरस्कारासाठी कोकण विभागातुन ३५० पेक्षा अधिक ऑनलाईन आलेल्या प्रस्तावामधून पालघर- १९, ठाणे- १०३, रायगड- २२, रत्नागिरी व सिंधुदुर्ग- १० असे एकूण १५४ शिक्षक तसेच ३० शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ११ संस्थाचालक यांना तर नागरी,सागरी व डोंगरी भागातील ५ जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, उपक्रमशील, प्रयोगशील व सर्जनशील शिक्षकांना व शिक्षणाची ज्ञानगंगा गावोगावी पोहचविणारे आधुनिक भगीरथ असलेले ११'शिक्षण संस्थाचालकाना वसंतस्मृती आदर्श शिक्षण संस्थापुरस्काराने आणि १५४ शिक्षकांना वसंतस्मृती आदर्श शिक्षक पुरस्काराने आणि ३० शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, निलिमा डावखरे,भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत,भाजपा ठाणे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले शिक्षण क्रांती संघटेनेचे अध्यक्ष सुधीर घागस, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, भाजपा नवी मुंबई अध्यक्ष रामचंद्रजी घरत, राजेंद्र राजपुत, परिवहन सदस्य विकास पाटील यांचे शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदेश सहसंयोजक विकास पाटील, सूत्रसंचालन कोकण विभाग सहसंयोजक विनोद शेलेकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनाची संपुर्ण धुरा भाजपा शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक विकास पाटील, प्रदेश कार्यकारिणी सदस्य एन.

एम. भामरे, कोकण विभाग संयोजक किशोर पाटील, कोकण विभाग सहसंयोजक विनोद शेलकर, ठाणे जिल्हा संयोजक संभाजी शेळके, कल्याण जिल्हाध्यक्ष सुभाष सरोदे , भाजपा शिक्षक आघाडी भिवंडी लोकसभा सहसंयोजक ज्ञानेश्वर घुगे यांनी सांभाळली आहे. त्याचप्रमाणे भाजपा शिक्षक आघाडीचे कोकण विभाग सहसंयोजक शेखर कुलकर्णी, अनिरुद्ध चव्हाण, महादेव सुळे, प्राविण सणेर, मंगेश भामरे, हिरामण कोकाटे, पष्टे सर, जगताप सर, रवि काळे यांचं सक्रीय आणि सहर्ष योगदान लाभले आहे. कोकण व जिल्हा कार्यकारिणीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे पुरस्कार वितरण सोहळा सर्वांगसुंदर व संस्मरणीय होण्यासाठी अतुलनीय व अविस्मरणीय योगदान राहीले आहे. पुढील वर्षापासून प्रत्येक जिल्हयातील शाळांचे विकासास प्रोत्साहन मिळावे म्हणून आदर्श शाळा पुरस्कार घ्यावा असी मागणी विकास पाटील यांनी करताच त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

# अंबरनाथ : साहित्य उद्यानाच्या दुरवस्थेमुळे पालिकेवर नाराजी




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ :** दहा वर्षांपूर्वी अंबरनाथला सुरु करण्यात आलेल्या राज्यातील पहिल्या साहित्य उद्यानात सुविधा पुरवण्यासाठी एक कोटी ७५ लाख रुपये निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार डॉ. बालाजी किणीकर आणि अंबरनाथ नगरपालिका प्रशासनाकडे माजी नगराध्यक्ष सुनील चौधरी यांनी केली आहे.

अंबरनाथमध्ये कवी किरण येले आणि माजी नगराध्यक्ष सुनील चौधरी यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रातील पहिले पद्मश्री मधु मंगेश कर्णिक साहित्य उद्यान सुरु करण्यात आले होते. राज्याचे तत्कालीन पालकमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते २६ जानेवारी २०१५ साली कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते रामदास फुटाणे, डॉ. महेश केळुस्कर, संभाजी भगत, अशोक नायगावकर आदी कवी साहित्यिकांच्या उपस्थितीत शानदार उद्घाटन सोहोळा पार पडला होता.

गेल्या काही वर्षांत उद्यानात जिल्हास्तरीय साहित्य संमेलन, कवी संमेलने, व्याख्याने, हिंदी साहित्य संमेलन, मान्यवरांच्या मुलाखती, वर्षा ऋतू संमेलन, दिवाळी पहाट यासारखे दर्जेदार उपक्रमांना अंबरनाथवासियांची भरभरून दाद मिळाली होती.

अंबरनाथमधील हुतात्मा चौकात सहा हजार चौरस फुटाच्या विस्तीर्ण जागेतील उद्यानात ८० विविध कवी, साहित्यिक यांची त्यांच्या छायाचित्रासह माहिती पहावयास मिळते. दिमाखदार आणि कल्पकतापूर्ण संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या साहित्य उद्यानाचे सर्वत्र कौतुक केले होते. मात्र काही वर्षांपासून नगरपालिकेने दुर्लक्ष केल्याने उद्यानाची सध्या दुरावस्था झाल्याने साहित्यिकांमध्ये नाराजीची भावना उमटल्याची खंत चौधरी यांनी व्यक्त केली.

भविष्यात उद्यानात लोकसहभागातून एक लाख पुस्तके जमा करण्याचा प्रयत्न आहे. त्याचप्रमाणे उद्यानात येणाऱ्या साहित्यप्रेमींना बसण्यासाठी आसन व्यवस्था, एम्पी थिएटर, संगीत व्यवस्था स्वच्छतागृह, कॉफी हाऊस आदी सोयी पुरवण्याचा मानस आहे, त्यासाठी नगरोत्थान उपक्रमांतर्गत एक कोटी ७५ लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्याची मागणी माजी नगराध्यक्ष चौधरी यांनी केली आहे.

## रुग्णालयाचा भुखंड ...

पान १ वरून ▶▶ करते, मात्र आरक्षित भुखंडावर अतिक्रमण त्यांच्या निदर्शनास आले नाही का? असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित करीत कारवाईची मागणी केली आहे.

महापालिकेच्या भुखंडावर अतिक्रमण केल्या बाबत पाहणी करण्यात येईल. अतिक्रमण पथकाकडून या ठिकाणी कारवाई करण्यात येईल. घणसोली विभागात कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण किंवा पदपथ फेरीवाले, भाजी विक्रेत्यांनी केल्यास त्यावर कारवाई करण्यात येईल, असे विभाग अधिकारी संजय तायडे यांनी सांगितले.

## शहापूरातील धान खरेदीत ...

पान १ वरून ▶▶ येणे,शेतकऱ्यांनी वेळेवर ई-पीक पाहणी न करणे, केवायसी नसल्याने चुकारे अदा करतांना येणाऱ्या अडचणी आदी गैरप्रकार समोर आले आहेत. दरम्यान २०२२/२३ मध्ये १२ हजार ८०३ बारदानांसह महामंडळाच्या पत्रानुसार दिडपटीने होणारी वसूल पात्र रक्कम १ कोटी ६० लाख ८९ हजार २६८ रुपयांचा आर्थिक घोटाळा केल्याप्रकरणी आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक व्यवस्थापकांमार्फत सहा जणांवर किन्हवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. डिसेंबर २०२३ मध्ये भातसानगर, शेलवली, सावरोली, मुसई, चोंढे, वेहळोली यांसह तब्बल ३७ गोदामात सुमारे २८ कोटींचा एक लाख २८ हजार क्विंटल भात खरेदी झाली आहे. यामध्ये तालुक्यातील चरीव केंद्रातील वेहळोलीसह चार गोदामात १३ हजार क्विंटल भात खरेदी झाली होती. या भात खरेदी केंद्रावरील वेहळोली गोदामात रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या केंद्रप्रमुखाने शेतकऱ्यांना ऑनलाइन बनावट पावत्या देऊन त्यांच्याकडून सुमारे कोट्यावधी रुपये उकळले असल्याचे समोर आले असून केंद्रप्रमुख याने मात्र पोबारा केला होता.

खर्डी येथे १५८२ शेतक-यांचे ५७ हजार १३६.२० क्विंटल इतके भात खरेदी केले होते. हा भात खर्डी येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एका नादुरुस्त व पडक्या इमारतीमध्ये ठेवला होता. संततधार पावसाने हे भात कुजून शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले होते.या मागे उपव्यवस्थापक वसावे याचे साटेलोटे उघडकीस आले होते.

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट आणि पोटगी, नावात बदल बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

कार्यालय - 9619188558 ■ +91 9158078601
ईमेल- jeevandeepvartanews2020@gmail.com

## “मी डोंबिवलीतच चव्हाण यांचे स्पष्टीकरण ”...

पान १ वरून ▶▶ गाठीशी आहेत. या राज्यांच्या मुख्यमंत्री पदासाठी कोणाच्याही स्वप्नात, मनात नसलेले चेहरे भाजपच्या दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांनी मुख्यमंत्री पदावर बसवून त्या त्या राज्यातील भाजपच्या इच्छुक, मुख्यमंत्री पदावर बसण्यासाठी सज्ज असलेल्या नेत्यांना हादरे दिले होते. आता तीच परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण केली जात आहे की काय, अशी धाकधूक भाजपच्या नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये आहे. राज्य भाजपमधील एक मोठा गट मात्र देवेंद्र फडणवीस यांनाच मुख्यमंत्री करावे, यासाठी देव पाण्यात बुडवून बसला आहे. तर, मराठा आरक्षण, आंदोलने विचारात घेता मराठा चेहरा महाराष्ट्राला असावा या चर्चा आणि अफवांच्या माध्यमातून भाजपचे ज्येष्ठ नेते विनोद तावडे, मंत्री रवींद्र चव्हाण, मुरलीधर मोहोळ, चंद्रशेखर बावनकुळे, गिरिश महाजन यांची नावे विविध माध्यमांतून चर्चेला येत आहेत. मोहोळ यांनी समाज माध्यमातून आपण या स्पर्धेत नसल्याचे स्पष्ट केले आहे. शनिवारपासून रवींद्र चव्हाण यांचे नाव चर्चेत आल्याने, अखेर चव्हाण यांना आपण दिल्लीत गेलेलो नाही आणि डोंबिवलीत असल्याचे स्पष्टीकरण द्यावे लागले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर घडलेल्या सर्व गुप्त हालचालींचे सूत्रधार म्हणून रवींद्र चव्हाण यांनी पार पाडलेली जबाबदारी. कोकणासह, ठाणे, कोकणपट्टीवरील त्यांची हुकमत आणि विधानसभा निवडणुकीत त्यांनी जेथे जेथे जोरकसपणे प्रचार केला. तेथील सर्व महायुतीचे उमेदवार निवडून आले. ते चौथ्यादा निवडून आले आहेत. ठाणे जिल्ह्याचे राज्य कारभारतील महत्वाचे स्थान विचार घेता, जिल्ह्यावर आता भाजपची हुकमत वाढविण्यासाठी रवींद्र चव्हाण यांचे नाव चर्चेत येत असावे, असे सांगत भाजपच्या एका नेत्याने नाव न छापण्याच्या अटीवर मात्र, या सगळ्या अफवाच आहेत. दोन दिवसात खरे काय ते चित्र पुढे येईल, असे सांगितले.

## ठाण्यात काँग्रेसला धक्का ...

पान १ वरून ▶▶ वार्ड अध्यक्ष संतोष झिमल तसेच काँग्रेसच्या इतर काही कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी भाजप ठाणे शहर अध्यक्ष संजय वाघुले, ठाणे सरचिटणीस मनोहर सुगदरे, मंडळ अध्यक्ष सुदर्शन साळवी, कार्यकारणी सदस्य अरविंद कलवार, प्रभाग सदस्य गजानन परब, भाजप कामगार मोर्चा सचिव प्रशांत तळवडेकर, उत्तर भारती मोर्चा ठाणे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मीकांत यादव, दिव्यांग सेल सचिव आमिन मिश्रा, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य हर्षला बुबेरा, कळवा मंडळ अध्यक्ष भूषण म्हात्रे, कळवा मंडळ अध्यक्ष अनुसूचित जाती मोर्चा नरेश गायकवाड उपस्थित होते.

## लालपरीचे तिकीट महागणार ?....

पान १ वरून ▶▶ एसटी महामंडळाने तब्बल १८ टक्क्यांनी भाडेवाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे.

एसटी महामंडळाचा हा निर्णय पाहता नवीन सरकारच्या काळात सर्वसामान्य माणसांचा प्रवास देखील महागणार असल्याची शक्यता आहे. कारण एसटी महामंडळाने राज्य सरकारकडे १८ टक्क्यांनी भाडे वाढ करण्याचा प्रस्ताव केलेला आहे. हा प्रस्ताव निवडणुकीआधी झाला होता. परंतु शिंदे सरकारच्या काळात हा होल्डर ठेवण्यात आला होता.

### महामंडळाला दररोज १५ कोटींचा तोटा

महाराष्ट्र सरकारने एसटी महामंडळाचा हा प्रस्ताव स्वीकारला तर मुंबई ते पुणे हा प्रवास ५० ते ६० रुपये महाग होणार आहे. याआधी २०२१ मध्ये शेवटची भाडे वाढ करण्यात आली होती. त्यानंतर एसटीच्या प्रवासात कोणतेही भाडेवाढ करण्यात आली नव्हती. परंतु गेल्या अनेक दिवसापासून एसटी महामंडळ तोट्यात आहे. एस टी महामंडळाने दिलेल्या माहितीनुसार त्यांना दररोज १५ कोटींचा तोटा सहन करावा लागत आहे. आणि हा तोटा भरून काढण्यासाठी भाडेवाढ करणे गरजेचे आहे. असे सांगितलेले आहे.

कर्मचाऱ्यांचे वेतनात सातत्याने वाढ होत आहे. तसेच इंधनाचा दर देखील वाढत आहे. सुट्ट्या भागांची किंमत देखील वाढत आहे . सेच टायर आणि लुब्रिकंटचे दर देखील सातत्याने वाढत असल्याने एसटी महामंडळाने भाडे वाढ करण्याची गरज आहे, असे सांगितलेले आहे. त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव सरकार पुढे पाठवलेला आहे. परंतु आता सरकारी यावर नक्की काय निर्णय घेणार आहे? हे पाहणे सगळयात महत्त्वाचे आहे

## जिल्हा रुग्णालयात ७२ मुलांवर शस्त्रक्रिया...

पान १ वरून ▶▶ रुग्णालयातील डॉक्टरांसह आवश्यक कर्मचारीवर्ग शस्त्रक्रिया करत होते. सायंकाळी सातवाजेपर्यंत या ७२ बालकांवरील शस्त्रक्रिया पूर्ण झाल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ कैलास पवार यांनी सांगितले. यासाठी संपूर्ण ठाणे जिल्ह्यामधून ठाणे जिल्हा रुग्णालयात बालकांना शस्त्रक्रियेसाठी दाखल करण्यात येत असल्याचे डॉ संकेत कुलकर्णी यांनी सांगितले. आरोग्य विभागाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत मुरबाड, शहापूर, जव्हार, ठाणे तसेच नवी मुंबईतून या बालकांची निवड करण्यात आल्याचे डॉ कुलकर्णी म्हणाले.

केईएमचे अधिष्ठाता व पालिकेच्या सर्व रुग्णालयांचे संचालक म्हणून १३ वर्षांपूर्वी निवृत्त झालेले डॉ. ओक हे वर्षाकाठी शासनाच्या विविध ग्रामीण रुग्णालयात तसेच इमेरीटस प्रोफेसर म्हणून पालिकेच्या शीव रुग्णालयात जाऊन सुमारे एक हजार बालकांच्या शस्त्रक्रिया करतात. यासाठी ते फुटकी कवडीची कोणाकडून घेत नाहीत. केईएमचे अधिष्ठाता व महापालिका रुग्णालयांचे संचालक म्हणून निवृत्त झाल्यानंतर डी.वाय.पाटील संस्थेत कुलगुरू म्हणून डॉ ओक यांनी काम पाहिले. तसेच प्रिन्स अलिखान हॉस्पिटलमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी काम केले. रविवारी सुट्टी न घेता डॉ संजय ओक हे आदिवासी भागातील तसेच गोरगरीब लहान मुलांच्या शस्त्रक्रिया करतात.

आरोग्य विभागाच्या उपजिल्हा तसेच जिल्हा रुग्णालयात खाजगी डॉक्टरांनी येऊन स्वेच्छेने रुग्णसेवा करावी, असे आरोग्य विभागाचे धोरण आहे. तथापि फारच थोडे खाजगी तज्ज्ञ अशा प्रकारे ग्रामीण भागातील आरोग्य विभागाच्या रुग्णालयात जाऊन शस्त्रक्रिया करतात. डॉ. ओक हे अशांपैकी एक असून गेली १३ वर्षे दर रविवारी शहापूर उपजिल्हा रुग्णालय, अलीबाग जिल्हा रुग्णालय, पनवेल रुग्णालय तसेच डेरवण येथील वालावलकर रुग्णालयात जाऊन लहान मुलांवरील जटील शस्त्रक्रिया करतात.

# मराठी साहित्य संमेलनासाठी पुणे-दिल्ली विशेष रेल्वे



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी पुणे-दिल्ली-पुणे विशेष रेल्वेची व्यवस्था दिल्लीत होणाऱ्या साहित्य संमेलनासाठी पुण्यातून दिल्लीला जाण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. देशाच्या राजधानीत दिल्लीत ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ होत आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी रेल्वेमंत्री यांच्याकडे स्पेशल ट्रेन सोडण्याची विनंती केली होती. केंद्रीय रेल्वे मंत्राकडून मुरलीधर मोहळ यांची विनंती मान्य करण्यात आली आहे. पुणे ते नवी दिल्ली दरम्यान १९ फेब्रुवारी २०२५ रोजी आणि नवी दिल्ली ते पुणे दरम्यान २४ फेब्रुवारी २०२५ रोजी विशेष रेल्वे सोडण्यात येणार आहे.

# थंडी कमी होणार अन् पाऊस पडणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

उत्तरेकडून थंड वारे वाहत असल्याने नाशिकमध्ये थंडीची लाट उसळली आहे. शनिवारी हंगामातील नीचांकी ८.९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली. आठवडाभरापासून मुंबईसह राज्यभरात नोंदविण्यात येणारा किमान तापमानाचा पारा आता वाढणार आहे. त्यामुळे मुंबईसह राज्यभरातील थंडी काहीशी कमी होणार आहे. तर दुसरीकडे दक्षिण भारतातील चक्री वादळामुळे पश्चिम, मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत हवामान ढगाळ राहील, हलका पाऊस पडेल, असा अंदाज हवामान अभ्यासकांनी वर्तविला आहे. हवामान अभ्यासक अश्रेया शेट्टी यांनी सांगितले की, दक्षिणेकडील चक्री वादळाचा परिणाम म्हणून सोमवारपासून गुरुवारपर्यंत मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता आहे.

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी